320

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २२/०३/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटी -३६१९/प्र.क्र.३६/E-७४६७१५ भाग-२/पोल-३, दिनांक २१ मार्च, २०२४.

**विषय** :- राज्यात ई- चलान प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. केपीएमजी कंपनीस मुदतवाढ देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटी -३६१९ / प्र.क्र.३६ / E-७४६७१५ / भाग-२ / पोल-३, दिनांक २१ मार्च, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०३२११५५०१९५१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. केपीएमजी कंपनीस मुदतवाढ देण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीसीटी-३६१९/प्र.क्र.३६/E-746715/भाग-२/पोल-३,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ मार्च,२०२४.

<u>वाचा:-</u>

(१) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक: GAD-मातंस०८०/४/२०१४-O/O Directorate of IT-DIT(MH), दि.१.७.२०१४ व दि.९.५.२०१९ दिनांक २४.४.२०२३, दि. ५.१०.२०२३

(२) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक: गृहआ-२०१५/प्र.क्र.२३०/आस्था-२, दिनांक २०.५.२०१५.

(३) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दिनांक २३.८.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

(४) गृह विभाग, कार्यादेश क्रमांक टीआरए / १२१३ / प्र.क्र.९/शिकाना/पोल-८, दिनांक ६.९.२०१६

(५) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ५.३.२०१९, दिनांक ३१.५.२०२१ व दिनांक २७.५.२०२२ व दिनांक २०.४.२०२३ व दिनांक ९.१०.२०२३, दि. १६.१.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

(६) गृह विभाग, शासन निर्णय सीसीटी३६१९/प्र.क्र.३६/पोल-३, दिनांक ७.८.२०१९, दिनांक २१.९.२०२१, दिनांक १८.८.२०२२, दिनांक २१.६.२०२३. दिनांक ४.१२.२०२३.

(७) अपर पोलीस महासंचालक, (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.अपोमसं (वा)/ ४५ / ई-चलान/मुदतवाढ/२३१२/२०२३, दिनांक ३.७.२०२३

(८) अपर पोलीस महासंचालक, (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.अपोमसं (वा.) /४५/नियोजन/ई-चलान/HPC बैठक आयोजन/३०७०/२०२३, दिनांक १.९.२०२३

(९) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१६.१.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त पत्र दि.७.२.२०२४

<u>**प्रस्तावना :**</u>

ई-चलान प्रकल्पासाठी दिनांक १०.९.२०१६ ते दिनांक १०.२.२०१७ या कालावधीसाठी मे.केपीएमजी यांची प्रकल्प सल्लागार म्हणून संदर्भ क्र.४ येथील कार्यादेशानुसार नियुक्ती करण्यात आली होती. गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ७.८.२०१९ अन्वये मे. केपीएमजी कंपनीस प्रकल्प

सल्लागार म्हणून दिनांक १०.२.२०१७ ते दिनांक ३०.९.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच गृह विभाग, शासन निर्णय दिनांक २१.९.२०२१ अन्वये मे.केपीएमजी कंपनीस प्रकल्प सल्लागार म्हणून दिनांक १.१०.२०२० ते दिनांक ३०.११.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तद्नंतर गृह विभाग, शासन निर्णय दिनांक १८.८.२०२२ अन्वये मे. केपीएमजी कंपनीस प्रकल्प सल्लागार म्हणून दिनांक १.१२.२०२१ ते दिनांक ३१.१२.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तद्नंतर गृह विभाग, शासन निर्णय दि. २१.६.२०२३ अन्वये मे. केपीएमजी कंपनीस प्रकल्प सल्लागार म्हणून दिनांक १.१.२०२३ ते ३०.६.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तद्नंतर दिनांक ९.१०.२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार "वन स्टेट ई चलान प्रकल्पाकरिता KPMG Advisory Services Private Limited कंपनीच्या एका वरिष्ठ सल्लागारास दि.१.७.२०२३ ते १९.९.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दिनांक ५.१०.२०२३ चा शासन निर्णय व वरील बैठकीतील निर्णयानुसार उपरोक्त सल्लागारास दिनांक २०.९.२०२३ ते १९.९.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे." तसेच "अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांचे कार्यालयातील प्रस्तावित व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit) हा प्रकल्प स्थापन करण्याच्या अनुषंगाने प्रकल्पाकरिता KPMG Advisory Services Private Limited कंपनीकडून (१) Road Safety Expert, (२) Marketing & Social Media Expert या कामाकरिता २ वरिष्ठ सल्लागारांना अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांनी कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून पुढील १ वर्षापर्यंत नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे." असा निर्णय घेण्यात आला व त्याबाबतचा शासन निर्णय दि. ४.१२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला.

आता अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१६.१.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये The Committee approved the revision in consultancy rates based on the new DIT GR "Government Resolution No: GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT(MH)" The Contract will be till 19th September, 2024 for the 1 resource (1 Consultants) as per the new DIT GR. असा निर्णय घेण्यात आला त्यानुसार ई-चलान प्रकल्पाच्या देखरेखीसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. केपीएमजी प्रा. लि., या कंपनीच्या एक सल्लागारास पूर्णवेळ तत्वावर दि.२०.९.२०२३ ते दि.१९.९.२०२४ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या उक्त नमूद दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ देण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील "उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समिती" च्या दिनांक १६.१.२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार "वन स्टेट ई चलान प्रकल्पाकरिता KPMG Advisory Services Private Limited कंपनीच्या एक सल्लागारास पूर्णवेळ तत्वावर दि.

१९.९.२०२४ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या उक्त नमूद दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ येत आहे."

२. उपरोक्त सल्लागारांना देण्यात येणारे मानधन व इतर भत्ते माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संदर्भ क्रमांक १ येथे नमूद दिनांक ९.५.२०१९ व दिनांक २४.४.२०२३ आणि दिनांक ५.१०.२०२३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार देय राहील तथापि, माहिती व तंत्रज्ञान विभागाने सल्लागारांच्या मानधनासंदर्भात भविष्यात काही सुधारणा केल्यास सदर सुधारणा उपरोक्त सल्लागारांना लागु राहतील. तसेच त्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाने सदर कंपनीची नेमणूक (Empanelment) करणे आवश्यक राहील.

३. सर्व सल्लागारांना देण्यात येणारे मानधन हे Man-Month/Quarterly Milestone तत्वानुसार असेल. सल्लागाराची देयके शासनास सादर करताना सल्लागाराने महिन्याच्या/तिमाहीच्या कालावधीत केलेल्या कामाचा तपशील/अहवाल शासनास सादर करणे आवश्यक आहे.

४. ई-चलान प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारांच्या मानधनाबाबतचा खर्च पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या "मागणी क्र. बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००) (०१) जिल्हा पोलीस बल, १३, कार्यालयीन खर्च (२०५५ ०१६८)" या लेखाशीर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३२११५५०१९५१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2024.03.21 15:59:49 +05'30'

**(कैलास गायकवाड)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

(१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
(२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
(३) प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
(४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(५) अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, मुंबई.
(६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
(७) विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, मुंबई.
(८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

(९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
(१०) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
(११) कक्ष अधिकारी, व्यय-७ / वित्तीय सुधारणा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(१२) मे.केपीएमजी ॲडव्हायझरी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई.
(१३) अर्थ शाखा गृह विभाग.
(१४) निवड नस्ती / पोल-३.